MHBI050008622022

## विशेष दिवाणी दावा क्र. ६४/२०२२ मधील निशाणी क्र.३८ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ तर्फे प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे वादी यांचेविरुध्द तुर्तातूर्त ताकीद मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ तर्फे अर्जात असे नमुद करण्यात आले की, मौजे जोगाईवाडी शिवारातील सर्व्हे क्र. ४३७ मधील प्लॉट क्र. १२ व १३ या दोन्ही मिळकती प्रतिवादी क्र. १ यांच्या स्वकष्टार्जित मिळकती असुन त्यावर प्रतिवादी क्र. १ हे मालक या नात्याने काबीज राहुन उपभोग घेत आहेत, वादग्रस्त मिळकतीमध्ये वादीस कसलाही हिस्सा नाही, वादी हा प्रतिवादींपासुन विभक्त रहात असुन तो व्यसनी असल्याने प्रतिवादींना त्रास देत आहे, वादीच्या विरूध्द प्रतिवादींनी पोलीस स्टेशनला तक्रारी दिलेल्या आहेत, वादी व वादीची पत्नी हे मुळ दावा हा न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादींसोबत सतत भांडणतंटे करत आहेत व प्रतिवादी क्र.१ हिस वादग्रस्त मिळकतीमधुन कायमचे बेदखल करण्याच्या धमक्या देत आहेत, प्रतिवादी क्र.१ ही वयोवृध्द व असहाय्य महिला असुन वादी व त्याची पत्नी प्रतिवादी क्र. १ हिस वादग्रस्त मिळकतीमधुन कायमचे बेदखल करण्याची शक्यता आहे, त्यामुळे मुळ दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादीने स्वत: अथवा इतरांमार्फत प्रतिवादी क्र.१ यांच्या वादग्रस्त मिळकतींवरील शांततामय कब्जे उपभोगास कसल्याही प्रकारे हरकत अडथळा निर्माण करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात व वादीच्या विरूध्द पारीत करण्यात यावा अशी प्रतिवादी क्र. १ यांनी विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जास वादी तर्फे निशाणी क्र. ४१ वर म्हणणे दाखल करून अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. वादीतर्फे असे नमुद करण्यात आले की, प्रस्तुत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.08 17:28:05 +0530

दाव्यातील वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ चे मयत पिता व प्रतिवादी क्र. १ चे पती रामभाऊ यांनी त्यांच्या हयातीमध्ये खरेदी केलेली असल्याने वादीचा त्यात समान हिस्सा आहे, म्हणुन वादीने प्रतिवादींच्या विरूध्द सरस निरस मानाने वाटणी करून स्वतंत्र ताबा मिळण्याबाबत दावा दाखल केलेला असुन वादी हा वादग्रस्त मिळकतीवर शांततामय कब्जा उपभोग त्यांच्या कुटुंबियासह आजतागायत घेत आलेला आहे, वादीने निशाणी क्र. ५ वरील अर्ज हा मुळ दाव्यात सोबत न्यायनिर्णयीत करण्याबाबत केलेल्या विनंतीचा गैरफायदा घेवुन व वादीस त्याच्या शांततामय कब्जे उपभोगास हरकत अडथळा करण्याच्या दुष्ट हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे, सबब प्रस्तुतचा अर्ज खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** अर्जाचे स्वरुप विचारात घेता खालील मुद्दे निर्माण होतात व त्यावर कारणांसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविणेत येतो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी प्रथमदर्शनी केस सिद्ध करतात काय? | **होकारार्थी** |
| २. | सोईचा समतोल प्रतिवादीच्या बाजूने आहे काय? | **होकारार्थी** |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादीस अपरिमीत हानी होण्याची शक्यता आहे काय? | **होकारार्थी** |
| ४. | काय आदेश? | **......अंतिम आदेशाप्रमाणे** |

## :–कारणमिमांसा :–

**०५.** अभिलेखावर प्रतिवादी क्र. १ तर्फे अर्जाच्या पुष्ठयार्थ यादी निशाणी क्र. ३६ च्या यादीसोबत दिनांक ०४.१२.२०२० रोजीच्या विवेक सिंधु या वृत्तपत्राची मुळ प्रत, प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांच्या विरोधात पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर येथे

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.08 17:28:11 +0530

दिलेला तक्रारी अर्ज, उप विभागीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिलेला तक्रारी अर्ज, उप विभागीय अधिकारी, अंबजोगाई यांना दिलेला तक्रारी अर्ज, प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांच्या विरोधात पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर यांना दिलेला उपोषणास बसण्याबाबतच्या अर्जाची छायांकीत प्रत, पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर यांनी प्रतिवादी क्र. १ यांना दिलेले समजपत्र असा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. वादी यांनी अर्जाच्या पुष्ठर्थ निशाणी क्र. ४ खालील यादीसोबत खरेदीखत क्र. २५०५/१९८८ ची प्रमाणीत प्रत, ग्रामपंचायत घर क्र. ६९८ च्या नमुना ८ ची प्रमाणीत प्रत, खरेदीखत क्र. ५५१/१९९१ ची प्रमाणीत प्रत,ग्रामपंचायत घर क्र. ६३९ च्या नमुना ८ ची प्रमाणीत प्रत, वादीच्या विरुध्द प्रतिवादीने १०७ सीआरपीसी प्रमाणे केलेल्या कार्यवाहीची प्रमाणीत प्रत व वाद मिळकतीच्या सह दुय्यम निबंधक अंबाजोगाई यांनी केलेल्या मुल्यांकन प्रमाणपत्राची प्रत व वाद मिळकतीचे फोटो असा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

०६. प्रतिवादीतर्फे ***विद्वान विधिज्ञ श्री.एम.एल.जाधव*** *यांचा* युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे ***विद्वान विधिज्ञ श्री. पी.बी. कदम*** यांचा युक्तीवाद ऐकला.

***मुददा क्र. १ ते ३ करीता***

**०७.** सदरचे तीनही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुर्नरावृत्ती टाळण्याकरिता सर्व मुद्दे एकत्रित विचारात घेण्यात येत आहेत. प्रतिवादीतर्फे प्रामुख्याने वादग्रस्त मिळकत ही स्वकष्टार्जित मिळकत असल्याचे व त्यावर ती मालक या नात्याने काबीज राहुन उपभोग घेत असल्याचे नमुद करण्यात आले आहे व वादी सदर उपभोगास हरकत अडथळा करत आहे असे नमुद करण्यात आले आहे. तर याउलट वादीतर्फे प्रस्तुत मिळकत ही वादीचे वडीलांनी खरेदी केलेली असल्याने त्यामध्ये वादीचा हिस्सा आहे व वादी त्याच्या कुटुंबियासह त्याचा उपभोग घेत आलेला आहे, परंतु वादीच्या उपभोगास हरकत अडथळा करण्याच्या हेतुने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे असे नमुद करण्यात

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.08 17:28:17 +0530

आले आहे.

०८. एकंदरीत दोन्ही बाजुचा युक्तिवाद, अर्ज व निशाणी क्र. ४१ वरील म्हणणे विचारात घेता अभिलेखावर दाखल यादी निशाणी क्र. ४ वरील खरेदीदस्त क्र. २५०५/१९८८ च्या प्रमाणीत प्रतीचे अवलोकन केले असता प्लॉट क्र. १३ हा प्रतिवादी क्र. १ यांनी भारत नामदेवराव महामुनी यांच्याकडुन खरेदी घेतला असल्याचे व सदर खरुदीखताअनुषंगे प्रतिवादी क्र. १ चे नाव ग्रामपंचायतला नोंद झाले असल्याचे तसेच प्लॉट क्र. १२ हा देखील खरेदीदस्त क्र. ५५१/१९९१ अन्वये वासुदेव बाबुराव सुरवसे यांच्याकडुन प्रतिवादी क्र. १ ने खरेदी घेतला असल्याचे व सदर खरदीदस्ताप्रमाणे प्रतिवादी क्र. १ चे नाव ग्रामपंचायतला नोंद झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. वादीतर्फे जरी सदरची मिळकत ही वादीच्या वडीलांनी विकत घेतलेली होती व सदरची मिळकत ही एकत्र कुटुंबाची मिळकत आहे व त्यामध्ये वादीचा हिस्सा आहे असे नमुद केले असले तरी तसा दर्शवणारा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही. प्रथमदर्शनी वादग्रस्त मिळकती या प्रतिवादी क्र. १ च्या मालकी व कब्जाच्या दिसुन येतात. तसेच अभिलेखावर दाखल यादी निशाणी क्र. ३६ वर दिनांक ०६.०६.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ यांनी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर, तसेच उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई, यांना दिलेल्या तक्रारी अर्जावरून तसेच कार्यकारी दंडाधिकारी यांची चॅप्टर केस क्र. २९५/२०२४ यावरून असे स्पष्ट होते की, वादी व प्रतिवादी क्र.१ च्या वादग्रस्त मिळकतीवरील कब्जेस हरकत अडथळा करत आहे. एकंदरीत प्रथमदर्शनी प्रतिवादी क्र. १ वादग्रस्त मिळकतीची मालक व कब्जेदार असल्याचे अभिलेखावर दाखल पुराव्यावरून स्पष्ट होते. तसेच वादी प्रतिवादी क्र. १ च्या मिळकतीस हरकत अडथळा करत असल्याचे देखील प्रथमदर्शनी सिध्द होते. तेव्हा अशा परिस्थीतीत सोईचा समतोल देखील प्रतिवादी क्र १ च्या बाजुने आहे. प्रतिवादी क्र. १ ही वादग्रस्त मिळकतीची मालक व कब्जेदार असल्याने अर्ज नामंजुर केल्यास निश्चितपणे अपरिमीत हानी प्रतिवादी क्र.१ ला होण्याची शक्यता आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.08 17:28:26 +0530

**०९.** प्रस्तुत दाव्यात प्रतिवादीतर्फे प्रतिदावा करण्यापूर्वीच प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्ज दाखल केल्यानंतर निशाणी क्र. ४९ वर प्रतिदावा दाखल करण्यात आला आहे. परंतु सदरचा प्रतिदावा अदयाप वाचुन दाखल करून घेण्यात आलेला नाही. तेव्हा या ठिकाणी प्रश्न निर्माण होतो की प्रतिदावा न दाखल करता प्रतिवादी क्र १ यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ (अ) या तरतुदी खाली हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त ताकीद वादी विरूध्द मागता येवु शकते का त्या पुष्ठर्थ प्रतिवादी क्र.१ तर्फे अभिलेखावर मा. उच्च् न्यायालय,बॉम्बे, खंडपिठ नागपुर यांचा ***''मंदाबाई अशोकराव टिंगणे वि. मोहम्मद मुताजीम मोहम्मद रिट पिटीशन क्र. ३१५६/२०११''*** यावर विश्वास दर्शवण्यात आलेला आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता मा. उच्च् न्यायालयामार्फत असे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे की, वाटपाच्या दाव्यामध्ये सर्व प्रतिवादी हे वादी असतात त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १(अ) ही तरतुद अशा दाव्यात लागु होत नाही व प्रतिवादी यांच्याकडुन तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज हा कायदेशीर ठरतो. सबब प्रस्तुतचे निरिक्षण विचारात घेता प्रस्तुत दावा हा देखील वादीतर्फे वाटप व कब्जेबरीता दाखल करण्यात आलेला आहे. तेव्हा अशा परिस्थीतीत सदरील न्यायनिवाडयातील तत्वाप्रमाणे दाव्यातील प्रतिवादी हे वादी असतात त्यामुळे निश्चितपणे प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज कायदेशीर ठरतो.

**१०.** एकंदरीत वरील कारणमिमांसा विचारात घेता प्रतिवादी क्र. १ तर्फे प्रथमदर्शनी केस सिध्द करण्यात आलेली आहे, सोईचा समतोल देखील प्रतिवादी क्र. १ च्या बाजुने आहे, तसेच अर्ज नामंजुर केल्यास अपरिमीत हानी ही देखील प्रतिवादी क्र. १ ला होण्याची शक्यता आहे, सबब **मुददा क्र. १ ते ३** चा निष्कर्ष ***" होकारार्थी "*** नोंदवितो व मुददा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.08 17:28:32 +0530

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र. ३८ खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो प्रतिवादी क्र. १ च्या वादग्रस्त मिळकतीवरील शांततामय कब्जे उपभोगास वादी यांनी स्वत: अथवा इतरांमार्फत हरकत कसल्याही प्रकारे हरकत अडथळा निर्माण करू नये असा तुर्तातूर्त ताकीद आदेश वादी यांच्या विरुध्द देण्यात येतो.

**"आदेश खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषीत करण्यात आला."**

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.04.08 17:28:37 +0530

(एम.बी.सोनटक्के),
दिनांक – ०८/०४/२०२६ २रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

| :: **Certificate of Stenographer** :: | | |
|---|---|---|
| "I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order." | | |
| Dictated On : | 08/04/2026. | |
| Transcribed On : | 08/04/2026. | |
| Checked & Signed On : | 08/04/2026. | |
| Date : Place : Ambajogai. | 08/04/2026. | **( A.S.Gangane )** Stenographer Grade – 3 2nd Jt. C.J.S.D., Ambajogai. |